" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

संदर्भ क्र.:उमवि/१२/नविन अ.क्र./ ७१७१ /९७. दिनांक : १६.१०.१९९७.

प्रति,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या
मान्यताप्राप्त संस्थांचे मा. संचालक,

यांसी...

विषय :- एम.सी.एम. अभ्यासक्रमाबाबत.

संदर्भ :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ४८/९७, दिनांक २७.०५.९७.

महोदय,

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे मान्यताप्राप्त संस्थांचे मा. संचालक यांना विदितच आहे की, मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जून, १९९७ पासून एम.सी.एम. या कोर्ससाठी नविन सुधारित अभ्यासक्रम लागू झालेला असून, सदरचा सुधारित अभ्यासक्रम विद्यापीठाचे वरील संदर्भिय परिपत्रकासोबत आपणांस पाठविण्यांत आलेला आहे. तसेच सदर अभ्यासक्रमातील सत्र-१, २, ३, ४ चे अनुक्रमे पेपर क्र. १०६, २०६, ३०६ आणि ४०६ अंतर्गत जो अभ्यासक्रम नमुद केलेला आहे, तो प्रॅक्टीकल्स व सेमीनार असा आहे व यात पहिल्या परिच्छेदात प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ५० गुणांची परीक्षा होईल, असे नमुद केलेले आहे. परंतु यामध्ये आता सुधारणा करण्यात आली असून, ही प्रात्यक्षिक परीक्षा ५० ऐवजी ६० गुणांची घेण्यात येईल. ही परीक्षा विद्यापीठ स्तरावर घेण्यात येईल व त्याचे स्वतंत्र-पणे वेळापत्रक विद्यापीठाकडून पाठविले जाईल. तसेच परीक्षकांची नियुक्ती ही विद्यापीठ करेल.

तसेच सदर अभ्यासक्रमातील "करिक्युलम" साठी ३० गुण व "बिझिनेस कम्युनिकेशन" साठी २० गुण अशी गुणांची विगतवारी आहे. त्याऐवजी सदर गुणांची विभागणी आता "करिक्युलम" साठी २० गुण व "बिझिनेस कम्युनिकेशन" साठी २० गुण अशी राहील. तरी सदर दुरुस्तीप्रमाणे मा. संचालक यांनी "करिक्युलम" व "बिझिनेस कम्युनिकेशन" साठी अंतर्गत ४० पैकी असणाऱ्या गुणांची पूर्तता करुन विद्यापीठाची परीक्षा सुरु होण्याच्या अगोदर पूर्तता करावी. तसेच एम.सी.एम. सत्र १ ते ४ साठी असलेली प्रात्यक्षिक परीक्षा दरवर्षी दर सत्राला लेखी परीक्षेच्या अगोदर घेण्यात येतील. मात्र नोव्हेंबर, १९९७ मध्ये घ्यावयाची प्रात्यक्षिक परीक्षा लेखी परीक्षा संपल्या नंतर घेण्यात येईल.

करितां, सर्व मान्यताप्राप्त संस्थांचे मा. संचालक यांना विनंतीपूर्वक कळविण्यांत येते की, या पत्राचा आशय आपल्या संलग्नित एम.सी.एम. कोर्सला प्रवेशित झालेले विद्यार्थी व संबंधित प्राध्यापक यांच्या नजरेस आणावा व त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उप कुलसचिव.

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना :-

१] मा. परीक्षा नियंत्रक, उ.म.वि., जळगांव.
२] मा. उप कुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध विभाग, उ.म.वि., जळगांव.
३] मा. सहा. कुलसचिव, परीक्षा-पूर्वार्ध/उत्तरार्ध विभाग, उ.म.वि., जळगांव.
४] मा. प्रोग्रामर, संगणक विभाग, उ.म.वि., जळगांव.

पी.३/*